
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 OCT 2024

पुण्यनगरी

# मूल्याधारित शिक्षणासाठी महात्मा गांधी आग्रही : डॉ. पाटील

**कोल्हापूर :** शिक्षण हा मानवी जगण्याचा, झुंजण्याचा आणि समर्पणाचा विषय आहे. शिक्षणाने माणूस खऱ्या अर्थाने मूल्यसमृद्ध बनतो. मूल्याधारित शिक्षणासाठी महात्मा गांधी आग्रही राहिले. त्यांच्या या शिक्षणाच्या संकल्पनेतूनच उद्याचा उज्ज्वल भारत उभा राहील, असे प्रतिपादन गांधीवादी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्राचार्य डॉ. विश्वास पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंतीनिमित्त दोन दिवसीय डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमालेत 'महात्मा गांधी यांची शिक्षण पद्धती' या विषयावर डॉ. पाटील बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



व्याख्यानात बोलताना प्राचार्य डॉ. विश्वास पाटील.

यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार उपस्थित होते. राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी परिचय करून दिला. अक्षय जहागीरदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले.

0 5 OCT 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उपक्रमशीलतेतूनच भाषेची समृद्धी



कोल्हापूर : प्रतिनिधी

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची घोषणा केंद्र सरकारने केली. या मागणीच्या पूर्णत्वामुळे मराठी भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहोर उमटली. येत्या काळात मराठीमधील विविध उपक्रमांना चालना मिळेल, तसेच उपक्रमशीलतेतून भाषा अधिक समृद्ध होईल, अशी भावना भाषा अभ्यासकांकडून व्यक्त केली जात आहे.

केंद्र सरकारकडून यापूर्वी सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला होता. यामध्ये तमीळ, संस्कृत, कन्नड, तेलगू, मल्याळम आणि ओडिया या भाषांचा समावेश आहे. आता मराठीबरोबरच पाली, प्राकृत, बंगाली, आसामी या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात

## अभ्यासकांचे मत : मराठी भाषेच्या वैभवावर राजमान्यतेची मोहर

आला. मराठी भाषा मुळातच अभिजात भाषा आहे; मात्र शासनदरबारी तशी मान्यता मिळाली नव्हती, ही मान्यता मिळावी, यासाठी विविध लेखक, विचारवंत यांच्यासोबतच राज्य शासनानेही पाठपुरावा केला, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली. ते म्हणाले, मराठीच्या अभिजात दर्जाबद्दल संशोधन करून तसा अहवाल केंद्र सरकारला देण्यासाठी प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली होती. या समितीने मराठी भाषा किमान अडीच हजार वर्षांपूर्वीपासून असल्याचे पुरावे आहेत, असे अहवालात म्हटले होते. तसेच देशातील ती एक महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे. विविध शतकांमध्ये साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाचा विचार करून तिचे अभिजातपण स्वयंसिद्ध आहे, असेही अहवालात म्हणल्याचे त्यांनी सांगितले.

अभिजात दर्जामुळे बोलीभाषांचा अभ्यास, संशोधन, प्राचीन ग्रंथ तसेच इतर भाषांतील साहित्य अनुवादित करण्यासाठी मदत केली जाईल. तसेच भाषेच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्तींना मदत केली जाईल. विशेषतः सांस्कृतिक आणि संशोधन क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी महावीर महाविद्यालयाच्या बी. एम. रोटे ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून दरवर्षी राष्ट्रपतींना हजारो पत्रे पाठवली जात. या पत्रांतून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, अशी मागणी केली जात असे. मराठीच्या प्रा. श्वेता परुळेकर यांनी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये याविषयी जागरूकता निर्माण केली होती.

“ मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा ही बाब आनंददायी आहे. मात्र, हा दर्जा केवळ कागदोपत्री राहू नये, मिळालेल्या या दर्जाचा उपयोग भाषेच्या संवर्धनासाठी व्हायला हवा. त्यासाठी योग्य पद्धतीने पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

नीलम मानगावे, ज्येष्ठ लेखिका

“ भाषा समृद्ध होण्यासाठी ती उपक्रमशील असावी लागते. मराठी भाषेला अभिजातचा दर्जा मिळाल्यानंतर भाषा संवर्धनाच्या विविध उपक्रमांसाठी मोठा निधी उपलब्ध होईल. विविध उपक्रम राबवले जातील. तसेच भाषेच्या वापरासंबंधी शासनाबरोबर सर्वसामान्यांतही सजगता येईल. त्यामुळे मराठी येत्या काळात अधिक समृद्ध होईल.

– डॉ. नंदकुमार मोरे, मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ


11:18 AM IMG-20241005-WA0001.jpg

05 OCT 2024



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन एम.बी.ए. करिअरच्या वाटचालीतील 'महत्वाचा' सोबती : शिवाजी विद्यापीठ



बदलत्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या काळात तसेच शैक्षणिक क्षेत्रात डिजिटल एज्युकेशन या संकल्पनेला विशेष महत्त्व प्राप्त होत आहे. कोरोनानंतरच्या काळात सर्व क्षेत्रात तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याच्या अनुषंगाने देश-विदेशात धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊ लागले आहेत. याला शिक्षण क्षेत्र अपवाद राहिलेनाही. शिक्षणाच्या विस्तारणाऱ्या कक्षा कौशल्याधारित रोजगाराभिमुख दिशेने मार्गक्रम करण्यासाठी शिक्षणाला तंत्रज्ञानाची जोड देणे, शिक्षण गुणवत्तापूर्ण, परिणामकारक व गतिशील रोजगाराभिमुख बनवणे हे मुख्य उद्देश आहेत.

## ऑनलाईन एम.बी.ए.कुणासाठी ?

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमल-बजावणीसाठी शैक्षणिक क्षेत्रात नवोपक्रम, संशोधन व विकसित तंत्रज्ञानाचा सहभाग या धर्तीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने लागू केलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विकसित भारत बनविण्याच्या भूमिकेत आहे. पारंपारिक शिक्षणाबरोबर आधुनिकदृष्ट्या ऑनलाइन शिक्षण आजच्या काळात महत्त्वाची गरज आहे. राष्ट्रीय विकासाच्या दृष्टिकोनातून शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्रांच्या बँका, आय.टी. वित्त, विविध औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या, मीडिया या घटकांमध्ये नोकरीच्या संधीच्या अथवा पदोन्नतीच्या अनुषंगाने व्यवस्थापन हा महत्त्वाचा भाग असून कोणत्याही कंपनीची यशस्वीता ही त्या कंपनीच्या व्यवस्थापनावर अवलंबून असते आणि ती एम. बी. ए. ऑनलाईन अभ्यासक्रमाद्वारे पूर्ण करता येते. त्याचाच पुढील टप्पा म्हणजेच ऑनलाईन एम.बी.ए. कोर्स आता शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेला आहे.

## शिवाजी विद्यापीठ : महाराष्ट्रातील एकमेव सार्वजनिक विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठ विद्यापीठ अनुदान आयोग, दूर शिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच ए. आय. सी. टी. ई.या संस्थांकडून ऑनलाइन एम. बी. ए., अभ्यासक्रमाला मान्यता मिळविणारे महाराष्ट्रातील एकमेव NAAC 'A'++ दर्जाचे मानांकन प्राप्त राज्य विद्यापीठ ठरले आहे.

## ग्लोबली एम. बी. ए. अभ्यासक्रम आणि सर्विससाठी इम्पोवेरिंग

आता ऑनलाइनएम.बी.ए. अभ्यासक्रम सुरू करून शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात लोकल ते ग्लोबल होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण पाऊल टाकले आहे. त्यामुळे पुणे - मुंबईच्या शैक्षणिक संस्थामध्ये एम.बी.ए., करण्यासाठी वाटा धुंडाळण्यापेक्षा शिवाजी विद्यापीठाद्वारे ऑनलाइन एम.बी.ए. कोर्स करण्याची सुवर्ण संधी प्राप्त झाली आहे.

• डॉ. नितीन रणदिवे •
(लेखक शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात सहा. प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत)

## पात्रता आणि समकक्षता

कोणत्याही विषयाचा पदवीधर या कोर्ससाठी पात्र आहे. या अभ्यासक्रमासाठी पात्र होण्यासाठी कोणतीही प्रवेश परीक्षा असणार नाही. ट्रान्सफर सर्टिफिकेट अथवा मायग्रेशन सर्टिफिकेटची आवश्यकता नाही. तसेच शिवाजी विद्यापीठातील ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमाची पदवी इतर कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या समकक्ष आहे. 'यूजीसी'ने ऑनलाइन, दूरस्थ आणि नियमित पदवी अभ्याक्रमांच्या अनुषंगाने ऑनलाइन, दूरशिक्षणाद्वारे मिळणाऱ्या पदवी, पदव्युत्तर पदवीला महाविद्यालय, विद्यापीठांमध्ये पूर्णवेळ शिकल्यानंतर मिळणाऱ्या पारंपरिक पदवीची समकक्षता प्रदान केली आहे. हा अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंत असणारी सर्व शैक्षणिक प्रक्रिया ऑनलाइन स्वरूपाची असणार आहे.

## फी सवलत फायदेशीर

या अभ्यासक्रमासाठी फीमध्ये शिवाजी विद्यापीठ तसेच संलग्नत महाविद्यालयातील आजी - माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, यांना तसेच त्यांच्या पाल्यांना शिवाय महिला, तृतीयपंथी, दिव्यांगजन यांना शैक्षणिक फीच्या १०% सवलत देण्यात येत आहे. तसेच ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमाचे शुल्क एका वर्षात चार टप्प्यात भरण्याची सुविधाही विद्यापीठाने केली आहे.

## ऑनलाईन एम.बी.ए. साठी मिळणाऱ्या सुविधा

सुसज्ज अशा लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे विषय तज्ञांनी विकसित केलेले व्हीडीओ लेक्चर्स, इ-बुक्स लाईव्ह कौन्सलिंग सेशन, डिस्कशन फोरम, प्रॅक्टीस टेस्टच्या माध्यमातून संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून रोजगाराची संधी मिळणार आहे.

## दुहेरी पदवीची सोय

ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होणारा विद्यार्थी इतर कोणत्याही अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होऊ शकतो. या संधीमुळे ऑनलाइन आणि दूरशिक्षण पद्धतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदाच होणार आहे.

## परीक्षा स्वरूप

या ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी असणारी परीक्षा ही बहुपर्यायी स्वरूपाची असणार आहे. तसेच निकाल व दीक्षांत पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्याला रिझल्ट तात्काळ ऑनलाइन प्राप्त होणार आहे. त्यामुळे प्रवेश ते परीक्षा आणि पदवी संपूर्ण शैक्षणिक कालावधीतील प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. त्यासाठी शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्रांच्या बँका, आय.टी., वित्त, विविध औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या, मीडिया या घटकांमधील वर्किंग प्रोफेशनल्सनी शिवाजी विद्यापीठाच्या https://online.unishivaji.ac.in/Admission या संकेतस्थळाला भेट द्यावी. अथवा मुख्यालयाच्या ०२३१-२६०९४५७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.